ePaper


# महायुतीचं सरकार आल्यास शेतकऱ्यांना कर्जमाफी; देवेंद्र फडणवीस

| वर्ष - 8 । अंक -130 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 18 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- ‘जर सुरुवात चांगली झाली नाही तर...’
- रोहित पहिल्या कसोटीतून बाहेर
- मी लष्कर-ए-तोयबाचा सीईओ बोलतोय
- शाह यांच्या महाराष्ट्रातील सर्व सभा रद्द

### उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा ‘भगवा प्रहार

# काँग्रेस आघाडी ‘समस्या’; तर भाजपा महायुती ‘समाधान’!

## महायुतीचे उमेदवार महेश लांडगे प्रचारासाठी विराट सभा





**। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज**

**भारताचा पाया सनातन आहे आणि सनातवर प्रहार हा महाविनाशाला आमंत्रण आहे. ‘बटेथे तब कटेथे.. अब बटेंगे नहीं... एक रहेंगे तो सेफ रहेंगे’. काँग्रेस सत्ताकाळात पाकिस्तान भारतात घुसखोरी आणि आतंकी हल्ले करीत होता. आम्ही संसदेत आवाज उठवत होतो. त्यावेळी पाकिस्तानशी संबंध बिघडतील म्हणून काँग्रेस यामुद्दावर बोलू नका, अशी भूमिका घेत होते. मात्र, आता नवा भारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात नवा भारत म्हणजे “हम छेडेंग नहीं लेकीन हमें छेडेंगे तो छोडेगे नहीं” असा संदेश जगभरात गेला आहे. हा नवा भारत आहे. घुसखोरी कराल, तर घुसून मारण्याची हिंमत ठेवतो. देशाच्या समस्येचे कारण काँग्रेस आघाडी आहे, तर समस्यांवरील समाधान भाजपा महायुती आहे, असा घणाघात उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी केला.**

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना-एनसीपी- आरपीआय- मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारासाठी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर रविवारी विराट सभा झाली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि सभेला सुरूवात झाली.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, गुजरातचे माजी मंत्री प्रदीज जडेजा, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, प्रखर हिंदूत्ववादी डॉ. मिलिंद एकबोटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, मंगला कदम, ज्येष्ठ नेते वसंत लोंढे, हभप दत्तात्रय गायकवाड, राष्ट्रवादीच्या कविता आल्हाट, शिवसेनेचे संभाजी शिरसाट, आरपीआयच्या चंद्रकांता सोनकांबळे, भाजपाचे शत्रुघ्न काटे, सुजाता पालांडे यांच्यासह महायुतीचे सर्व नेते, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते आणि हजारो नागरिक उपस्थित होते. योगी आदित्यनाथ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यभूमिला नमन करतो. महाराष्ट्रात नवीन सरकार बनवण्यासाठी निवडणूक होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात महायुती गठबंधन आहे. गेल्या १० वर्षांत नवा भारत निर्माण होत आहे. ‘सबका साथ सबका विकास’ या भावनेतून देशाची प्रगती सुरू आहे. कुणाचे तुष्टीकरण केले जात नाही.

भारताला जोडणाऱ्या शक्ती ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ विचाराने महागठबंधन म्हणून एकत्र आल्या आहेत. दुसऱ्या बाजुला ‘महाअनाडी गठबंधन’ आहे. ज्यांच्याकडे निती, नियत आणि निर्णय घेण्याची क्षमता आणि सामर्थ्य नाही. “सबका साथ लेकीन परिवारका विकास” असा ज्यांचा नारा आहे. त्यांनी भारताच्या विकासाचा विचार केला नाही.



“ स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने देशाचे तुकडे केले. जाती-जातीमध्ये, प्रांतांमध्ये विभाजन केले. हिंदूंनी एकत्रितपणे राष्ट्रकार्यात योगदान दिले पाहिजे. गोरक्षक, हिंदूत्वासाठी समर्पित भावनेतून काम करणारे आमदार महेश लांडगे यांच्या सन्मानासाठी महाराष्ट्रात आलो. जमलेला विशाल जनसमुदाय हा महाविजय संकल्प सभा आहे. भाजपा महायुतीला ताकद द्या. डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून नवा भारत घडवण्यासाठी दि. २० नोव्हेंबर रोजी आमदार महेश लांडगे यांना मतदान करुन भाजपा महायुतीला साथ द्यावी, असे आवाहन करतो.

-योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री, उत्तरप्रदेश.

## महाराष्ट्राबाबत संपूर्ण देशाला कृतज्ञता...

महाराष्ट्राबाबत संपूर्ण देशवासीयांमध्ये कृतज्ञता भाव आहे. हिंदूवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या भूमित करुन दाखवली. अटक ते कटक अखंड भारत कसा असावा, याची शिकवण पेशवा बाजीराव यांनी दिली. एक विधान सब है समान’ असे संविधान देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारखे महामानव देशाला देणारा हा महाराष्ट्र आहे. त्यामुळे या राज्याप्रती देशावासीयांना कृतज्ञता वाटते, अशा भावना योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केल्या आहेत.

## नवा भारत... भाजपा डबल इंजिन सरकार...

कोल्हापूर येथील विशाळगडावर अतिक्रमण होते आहे. त्या ठिकाणी कारवाई केली, तर दगडफेक केली जात आहे. शिवरायांच्या किल्ल्यावर अतिक्रमण होते, याचे आश्चर्य वाटते. असे का झाले कारण आपण विभागलो होतो. अयोध्या, काशी- मथुरामध्ये अवमान झाला. 1947 मध्ये लाखो हिंदुंची कत्तल झाली, कारण आपण जाती-जातींमध्ये विभागलेलो होतो. पण, आता हा नवा भारत आहे. भाजपा महायुतीला साथ द्या. गेल्या १० वर्षांत पाकिस्तानची अशी अवस्था झाली आहे की, जगभरात त्यांना कोणी थारा देत नाही.

“ मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आगमनामुळे मतदार संघामध्ये उत्साह संचारला आहे. भोसरीच्या याच ऐतिहासिक मैदानावर ‘व्हीजन-२०२०’ सभा झाली होती. केलेली विकासकामे, सोडवलेले प्रलंबित प्रश्न आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. २०१४, २०१९ आणि आता २०२४ ची ऐतिहासिक महाविजय सभा झाली. महायुती सरकारने गायीला राज्यमाता दर्जा दिला. गोवंश संवर्धन कायदा केला. देव-देश अन् धर्म यासह शेती-माती संस्कृतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारानुसार बारा बलुतेदार आठरा पगड जातींना सोबत घेवून जाणारे हिंदुत्व आम्ही मानतो. ‘सबका साथ सबका विकास’ हा विचार आहे. पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटेल, असा विकास करुन दाखवणार आहोत.

- महेश लांडगे, आमदार, उमेदवार, भाजपा महायुती.

### मिशन विधानसभा: सांगता सभा धावत पळत गाठली

# ‘सातबारा’वरची ताबेमारी आता पाठवा घरी!

## अजित गव्हाणे यांना निवडून आणण्यासाठी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या दहा वर्षातले भोसरीतले 184 सातबारा उतारे मी पाहिले आणि तेव्हा माझी खात्रीच पटली की उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ रविवारी भोसरीमध्ये खरेच बोलले. योगी आदित्यनाथ म्हटल्याप्रमाणे” इनका नारा सबका साथ और सिर्फ परिवार का विकास” असेच चित्र भोसरी विधानसभा मतदारसंघात आहे. म्हणूनच तुतारी अशी वाजवा की कमळाची पाकळी शिल्लक राहू नये असे सांगतानाच ‘सातबारा’वरची ताबेमारी आता पाठवा घरी” असे आवाहन देखील डॉ. कोल्हे यांनी केले.**



महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे भोसरी मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ चिखली येथे शिरूर लोकसभेचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी महाविकास आघाडीतील सर्व पदाधिकारी माजी नगरसेवक उपस्थित होते. डॉ कोल्हे पुढे म्हणाले, भोसरी मतदारसंघांमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा झाली त्यामुळे मी बोलणे फार गरजेचे होते. योगी आदित्यनाथ या सभेत बोलताना म्हणाले “इनका नारा सबका साथ और सिर्फ परिवार का विकास “ पण त्यानंतर मी हे 184 सातबारा पाहिले तेव्हा योगी आदित्यनाथ यांचे बोलणे मला शब्दश: पटले. हे सातबारा पाहिल्यानंतर “ इनका एक ही नारा कॉन्ट्रॅक्टर का साथ और सिर्फ परिवार का विकास” अशी स्थिती आहे. म्हणूनच भोसरी मतदारसंघांमध्ये “ तुतारी वाजवा, सातबारा वाचवा, तुतारी वाजवा भोसरी वाचवा” ही महत्त्वाची गोष्ट भोसरीकरांनी मनावर घेतली आहे.

मागील सभेमध्ये मी बकासुराची गोष्ट येथील नागरिकांना सांगितली होती असे सांगून डॉ. कोल्हे म्हणाले, पुराणातील ही कथा आज काहींची प्रवृत्ती बनली आहे. या प्रवृत्तीला नष्ट करणे गरजेचे आहे .म्हणून येत्या 20 नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांचे “तुतारी वाजवणारा माणूस” या चिन्ह समोरील बटन दाबून त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करायचे आहे.

डॉ. कोल्हे म्हणाले मी वैयक्तिक टीका कधीच करत नाही. पण विद्यमान आमदार व्यासपीठावरून वीस तारखे नंतर बघून घेतो अशी जर भाषा वापरत असेल तर त्यांना त्याच भाषेत उत्तर देणे गरजेचे आहे. माझ्या माता माऊली घरातल्या प्रत्येक मुलाला सांगत असतात “उतू नको मातू नको, कारण उतमात केल्यानंतर गर्वाचे घर हे नक्की खाली येत असते. भाजपने महाराष्ट्राच्या राजकारणाला गालबोट लावले खासदार डॉ.अमोल कोल्हे म्हणाले ,भाजपने महाराष्ट्राच्या राजकारणाला गालबोट लावण्याचे काम केले. आतापर्यंत आपल्याला चप्पल ,शर्ट विकत घेता येतो. हे माहीत होते परंतु भाजपने 50 खोके देऊन आमदार विकत घेतले. भाजपने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली शिवसेना आणि शरदचंद्रजी पवार साहेबांनी निर्माण केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. हे विकले गेले आणि आपल्याला नैतिकतेच्या गोष्टी शिकवतात. दिवसेंदिवस महागाई प्रचंड वाढत आहे. महाराष्ट्रातले आठ

> भोसरी विधानसभा मतदारसंघाची अक्षरशः विदारक परिस्थिती आहे. लाखो रुपयांचे घर घेऊन टँकरने पाणी विकत घ्यावे लागते हे कोणाचे पाप आहे. जाहिरातबाजी करता ,पाणी आणले सांगता मग विकत पाणी घेण्याची वेळ का आणली. तुमच्या जाहिरातबाजीप्रमाणे शहरात विकासाची गंगा आली असती तर कदाचित मी निवडणुकीला उभा राहिला नसतो. मात्र तुम्ही भोसरीकरांना निवडणूक हातात घ्यायला लावली. त्यामुळे आता परिवर्तन अटळ आहे.
>
> -अजित गव्हाणे, उमेदवार महाविकास आघाडी.

### यूपीच्या तरुणांना महाराष्ट्रात यावे लागते

उत्तर प्रदेशातल्या तरुणांचा रोजगारासाठी महाराष्ट्रात यावे लागते आणि त्या प्रदेशाचे मुख्यमंत्री आपल्याला कटेंगे बटेंगे सांगतात. रोजगारासाठी तिथल्या तरुणांची आंदोलने पहा. तिथल्या झाशीच्या हॉस्पिटलमध्ये आग लागून बालके मृत्यूमुखी पडतात. म्हणून मला उत्तर प्रदेशचया मुख्यमंत्र्यांना सांगावेसे वाटते की, उत्तर प्रदेशातल्या गंगा यमुनेच्या भुसभुशीत मातीत हा वीखारीपणा उगवत असेल. पण हा सह्याद्रीचा काळा पाषाण आहे. जिथे छत्रपती शिवाजी महाराजांनी 18 पगड जातींना एकत्र घेऊन बारा बलुतेदारांना एकत्र करून स्वराज्य निर्माण केलं. ही विधानसभा निवडणूक नागरिकांनी हातात घेतली आहे.

शेतकरी दररोज आत्महत्या करतात. 200 शेतकऱ्यांच्या तिरडी महिन्याला उचलावी लागते. यांना विकासावर काहीच बोलता येणार नाही. लोकसभेत महाराष्ट्राने यांना हद्दपार केले म्हणूनच यांना लाडकी बहीण आठवली. कटेंगे बटेंगे महाराष्ट्रात चालत नाही खासदार डॉ.अमोल कोल्हे म्हणाले.

### भोसरीतील ‘लक्ष्मी दर्शन’ महाविकास आघाडीवर ‘बुमरँग’

## गव्हाणे यांचा दावा फोल : पैसे वाटप करताना स्वत:चेच कार्यकर्ते रंगेहात

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांनी निवडणूक शेवटच्या टप्प्यात असताना गंभीर विषयावर संवाद साधायचा आहे, असा निरोप प्रसारमाध्यमांना दिला. महायुतीचे उमेदवार महेश लांडगे समर्थकांकडून ‘लक्ष्मीदर्शन’ बाबत ‘फेक नॅरेटिव्ह’ केला जात आहे. पोलीस प्रशासनाला हाताशी धरुन महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला जात आहे, असा आरोप करण्यात आला.**




विशेष म्हणजे, “पराभव समोर दिसू लागल्याने भाजप उमेदवाराकडून पैसे वाटप केल्याची बदनामी” केली जात आहे, असा दावाही करण्यात आला. रविवारी दुपारी पत्रकार परिषद झाली आणि सायंकाळी सोशल मीडियावर एक व्हीडिओ व्हायरल झाला.

त्यामुळे ‘लक्ष्मीदर्शन’चा मुद्दा महाविकास आघाडीवर ‘बुमरँग’ झाला.सदर ‘व्हीडिओ’मध्ये पंतनगर, चिखली येथील महाविकास आघाडीचा एक कार्यकर्ता दत्तात्रय जगताप यांना पैसे वाटप करीत असताना महायुतीचे उमेदवार महेश लांडगे समर्थकांनी रंगेहात पकडला. सदर व्यक्ती मतदान कार्ड घेऊन आलेल्या व्यक्तीला पैसे वाटप करीत आहे. त्यामुळे मतदार संघामध्ये एकच खळबळ उडाली.

### सहानुभूती मिळवण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न...

भोसरी मतदार संघामध्ये दडपशाही, गुंडशाही आणि दहशत आहे, असा आरोप महाविकास आघाडीकडून वारंवार केला जात होता. तसेच, महायुतीकडून मोठ्या प्रमाणात पैसे वाटप केले जात आहेत. तसेच, आमची बदनामी करण्यासाठी खोट्या बातम्या मतदार संघामध्ये पसरल्या जात आहेत, असा दावा करीत अजित गव्हाणे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही तासांतच त्यांचेच कार्यकर्ते पैसे वाटप करताना सापडले. त्याचा व्हीडिओ सोशल मीडियामध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. त्यामुळे महाविकास आघाडी आणि उमेदवारांचा सहानुभूती मिळवण्याचा केविलवाना प्रयत्न फसला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### काय म्हणाले होते अजित गव्हाणे?

भोसरी मतदारसंघांमध्ये शनिवारी रात्री महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून पैसे सापडले आणि काही कार्यकर्त्यांना अटक केली, असा ‘फेक नेरेटिव्ह’ पसरवला गेला. यातून जाणीवपूर्वक नागरिकांना संभ्रमित करण्याचा प्रयत्न झाला. वारंवार अशा प्रकारचे प्रयत्न विरोधी उमेदवारांकडून होत आहेत. पोलीस, निवडणूक विभाग या सर्वांकडे तक्रार करूनही कारवाई होत नाही. महाविकास आघाडीला मिळत असलेल्या प्रतिसादामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना पराभव होताना दिसत आहेत. त्यामुळे जाणीवपूर्वक नागरिकांना आमिष दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र नागरिकांनी ही निवडणूक हातात घेतली असून गेल्या दहा वर्षातल्या दहशत, दडपशाहीला नागरिक चोख उत्तर देतील, असा दावा अजित गव्हाणे यांनी केला होता.

# वाकडकरांचा निर्धार; अब की बार; शंकरभाऊच आमदार!

## शंकर जगताप: चिंचवड मतदारसंघ विकासाचा 'रोल मॉडेल' असेल!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जे आज विधानसभा निवडणुकीत विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारत आहेत, त्यांनी स्वतःच्या घरात ४० वर्ष सत्ता असतानाही वाकड परिसराचा विकास केला नाही. अशा निष्क्रिय उमेदवाराला आम्ही यावेळी चौथ्यांदा घरी बसवणार असून "अबकी बार; शंकरभाऊच होणार आमदार" असा निर्धार वाकडमधील ग्रामस्थ आणि सदनिकाधारकांनी केला आहे.**



चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाइं (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ वाकड येथील सोसायट्यांमध्ये कोपरासभेच्या माध्यमातून नागरिकांच्या गाठीभेटी घेत संवाद साधला. या कोपरा सभांना वाकडमधील सदनिकाधारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सभेत वाकडकरांनी हा निर्धार केला आहे. यावेळी वाकडमधील सोसायटीधारक आणि ग्रामस्थांनी संवाद साधत आपल्या समस्या त्यांच्याकडे मांडल्या. तसेच स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी गेल्या दहा वर्षात आपल्या कार्यकर्तृत्वाच्या माध्यमातून या चिंचवड मतदार संघाचा आणि विशेष म्हणजे वाकड गावचा सर्वांगीण विकास केला आहे. त्यांच्यासारखाच विकास आपण कराल अशी आम्हाला खात्री आहे, अशा भावना वाकडमधील सोसायटीधारकांनी यावेळी व्यक्त केल्या. या गावभेट दौऱ्यात वाकड येथील कॅपिटल टॉवर्स सोसायटी, शुभ लक्ष रेसिडेन्सी, ओपस 77 सोसायटी, सुखवानी स्काय पार्क सोसायटी, कुमार पिकेडीली सोसायटी, इथोस सोसायटी, डीएलवी एलवीरा सोसायटी, एसीई अलिमीटी, वेदांता टॉवर सोसायटी, आइसलँड सोसायटी, प्रिस्टीन प्रोलाइफ सोसायटी, सीगम्म सोसायटीसह वाकडमधील विविध सोसायट्यांमध्ये कोपरा बैठकीच्या माध्यमातून शंकर जगताप यांनी सोसायटीधारकांशी संवाद साधला. यावेळी विशाल कलाटे, भारती विनोदे, राम वाकडकर, पिंपरी चिंचवड शहर आरपीआय (आठवले) शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, प्रसाद कस्पटे, अमोल कलाटे, श्रीनिवास कलाटे, स्नेहा कलाटे, पियुशा पाटील, रणजीत कलाटे, संतोष वाकडकर, रामदास कस्पटे, अक्षय कलाटे, आकाश बोडके, सनी कलाटे, रावसाहेब डोंगरे, सुरज भुजबळ, ॲड. अमोल भुजबळ, पंकज भंडारे, विशाल वावळकर, किरण समिंदर, अथर्व कलाटे, सोन्या कुंभार, विक्रम कलाटे, प्रमोद भुजबळ, सनी भुजबळ, राकेश भंडारे, निखिल भंडारे, शुभम भुजबळ, राजेश बोबडे, अविनाश शिरसाठ, प्रथम वारभुवन, वैभव वाघमारे, किरण जाधव, करण देवकर, तेजस्विनी धोमसे, रमेश कुहाडे, आकाश बोडके, अभिमान कलाटे, सुदेश राजे, परशुराम फड, चेतन कलाटे, सुजित कांबळे, योगेश भोसले, सनी कलाटे, शीलवंत ठोंबरे, रोहित गटकळ, अतुल कलाटे, संकेत कलाटे, यश कलाटे, यांच्यासह मित्र पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून मागील दहा वर्षांच्या कार्यकाळात चिंचवड विधानसभा मतदारसंघात अनेक विकासकामे झाली आहेत. परंतु वाढत्या नागरिकीकरणामुळे गेल्या पाच वर्षात मूलभूत सुविधांवर अतिरिक्त ताण पडला आहे. मात्र केंद्र सरकार, राज्यातील महायुती सरकार आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने आपण मतदारसंघातील सर्व समस्या सोडविण्याच्या उद्देशाने पाऊले टाकली आहेत. आणि त्यामध्ये आपण बहुतांशी यशस्वी झालो आहेत. येणाऱ्या काळात आपल्या मतदारसंघात प्रत्येक नागरिकाला मुबलक पाणी, चांगले रस्ते, ट्राफिक मुक्त रस्ते, प्रदूषण मुक्त शहर या सर्व सुविधा पुरविण्याकडे आम्ही प्राधान्याने लक्ष देणार आहे. आणि विकासाच्या माध्यमातून आपल्या चिंचवड मतदारसंघाचा पुन्हा एकदा चेहरामोहरा बदलून इतर मतदारसंघांसाठी आपला मतदारसंघ 'रोल मॉडेल' ठरेल, असा मी आपणास विश्वास देतो.
>
> **- शंकर जगताप,** महायुतीचे उमेदवार.

### मतदारसंघाला विकासाचा 'रोल मॉडेल' बनविणार

यावेळी बोलताना जगताप म्हणाले की, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सर्व सोसायटीधारकांच्या असणाऱ्या मूलभूत समस्यांवर लवकरात लवकर तोडगा काढून येणाऱ्या काळात सर्व सोसायट्यामध्ये सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून या सर्व सोसायट्या समस्या मुक्त करून आपल्या चिंचवड मतदारसंघाला विकासाचा 'रोल मॉडेल' बनविणार आहे.

---

# व्यापारी वर्गाच्या समस्या निवारणासाठी कटिबद्ध: आ. बनसोडे

## सिंधी बांधव व व्यापाऱ्यांचा अण्णा बनसोडे यांना विजयी करण्याचा निर्धार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी कॅम्पातील व्यापारी वर्गामध्ये वाहतूक कोंडी पार्किंग सुविधा नसणे यावरून काहीशी नाराजी होती. मात्र या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले असल्याने आम्ही एक दिलाने आमदार बनसोडे यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे प्रतिपादन माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी केले.**



तर आपण कालही सिंधी बांधवांसाठी व व्यापारी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध होतो, आजही आहे आणि उद्याही कटिबद्ध राहील अशी ग्वाही पिंपरी विधानसभा मतदारसंघातील महायुती राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.पिंपरीत आयोजित या पत्रकार परिषदेत आमदार उमाताई खापरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष व महायुतीचे समन्वयक योगेश बहल, आरपीआय आठवले गटाच्या महिला प्रदेश अध्यक्ष व जेष्ठ माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, शहराध्यक्ष कुणाल वावळकर, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत, ज्येष्ठ उद्योजक व पिंपरी चिंचवड व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवाणी, माजी नगरसेवक तुषार हिंगे, संदीप वाघेरे, जगन्नाथ साबळे, हरेश बोधानी, प्रसाद शेट्टी, शितल शिंदे, शैलेश मोरे, जगदीश शेट्टी, रोहित काटे, तसेच पिंपरी कॅम्प मधील व्यापारी किशोर केशवानी, लच्छू बूलानी, जयेश चौधरी, गोपाळ खत्री आदी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले की, अण्णा बनसोडे हे लोकांच्या अडचणीला धावून जातात त्यामुळेच मागील वेळी पिंपरी कॅम्प मधील व्यापाऱ्यांनी आग्रह करून अजित पवार यांच्याकडून त्यांच्यासाठी उमेदवारीचा आग्रह धरला. पिंपरी कॅम्पातील वाहतूक कोंडी पार्किंग सुविधा यावरून व्यापाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर पार्किंग समस्या सोडवण्याबाबत आग्रही मागणी केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे प्रश्न मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिले. त्यामुळे अण्णा बनसोडे आणि व्यापारी वर्गांमधील दुरावा दूर झाला आहे, मनोमिलन झाले आहे. असे बहल यांनी सांगितले.

> उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराचा विकास केला हा विकास करताना सर्व जाती धर्माला विश्वासात घेऊन त्यांनी काम केले. त्यामुळे अजित पवार हे उमेदवार आहेत असे समजून काम करायचे सर्वांनी ठरविले आहे ज्या नेत्यांना आपण मानतो त्यांचा आदेश मानने महत्त्वाचे असते. बुधवारी (दि.२० नोव्हेंबर) होणाऱ्या मतदानाच्या दिवशी घड्याळ चिन्ह समोरील प्रथम क्रमांकाचे बटन दाबून विजयी करण्याचे आवाहन करतो.

### शिक्षणावरून भांडवल करणे अयोग्य...

महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉक्टर असल्याचे सांगतात मात्र सामाजिक क्षेत्रात काम केल्याबद्दल अनेकांना अशी पदवी मिळते. अण्णा बनसोडे यांचे ड्राफ्टिंग चांगले आहे, अक्षर चांगले आहे ते शिक्षित आहेत. लोकांच्या समस्या समजून घेऊन कशा सोडवाव्यात हे त्यांना चांगलेच माहित आहे. त्यामुळे त्यांच्या शिक्षणावरून भांडवल करणे अयोग्य असल्याचे बहल यांनी सांगितले. डब्बू आसवानी म्हणाले की, गेल्या दहा वर्षापासून पिंपरी कॅम्पात विशेषता राधिका, साई चौकात वाहतूक कोंडी आणि पार्किंगचा प्रश्न आहे तो सोडवावा अशी आमची मागणी होती. अजित पवार यांनी याबाबत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले त्यामुळे अण्णा बनसोडे यांना बहुमताने निवडून देण्याच्या सर्व सिंधी समाज बांधव व व्यापाऱ्यांनी निर्धार केला आहे.



## भूमिका

# नेत्यांच्या भाषेत ही सवंगता येते तरी कुठून?



**कोणी कोणाचा 'बाप' काढतो. कोणी कोणाचा 'काका' काढतो. कोणी कोणाच्या शारीरिक वैगुण्यावर प्रहार करतो, तर कोणी कोणाला 'फिरू न देण्याची', 'गाडून टाकण्याची', 'संपवून टाकण्याची' भाषा करतो. समोरची गर्दीही चेकाळल्यासारखी प्रतिसाद देते हे असे राजकारण आपल्याला अपेक्षित आहे का?**

लोकशाहीत 'राजकारण' हे खरे तर समाजकारणाचे एक साधन. 'समाजकारण करता यावे, समाजसेवा करता यावी म्हणून सत्तेचा सोपान चढतो आहोत', असे म्हणणारे नेतेही आपल्याकडे विपुल आहेत. ही भूमिका फक्त सत्ताप्राप्तीपर्यंतच मर्यादित असते, हे त्यांच्या पक्के ध्यानी असते; आता फक्त जनतेने हे लवकर ध्यानी घेणे आवश्यक आहे. समाजसेवेचे नाव घेत सत्तेचे पद एकदा हस्तगत केले की मग त्यांना लोकांच्या भल्याचा विसर पडतो आणि 'घरभरणी' सुरू होते. एकदा सुरू झालेली ही घरभरणी मग पाच-सात पंचवार्षिक आणि त्याहीनंतर- पुढच्या पिढ्यांपर्यंत- थांबायचे नावच घेत नाही. 'लोकशाही राजा-राणीच्या उदरातून नव्हे; तर मतपेटीतून जन्माला येईल' असे म्हटले गेले. पण आमच्या सरंजामी मानसिकतेने हे फोल ठरवले. पिढ्यानपिढ्या घराणेशाही चालू आहे. या घराणेशाहीला आता एकही पक्ष अपवाद राहिलेला नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्वकर्तृत्वाने, खऱ्या अर्थाने जनसेवा करत उदयाला आलेले नेतृत्व स्वाभाविकपणेच संयमी होते. मुळातळातून त्यांची जडणघडण झालेली असल्याने त्यांना समाजाचे प्रश्न समजत होते, उमगत होते. समाजाशी, पक्षीय विचारांशी त्यांची बांधिलकी होती. कितीही प्रलोभने समोर उभी ठाकली तरीही मुरारबाजीसारखी ही पिढी पक्षनिष्ठ, स्वामिनिष्ठ असायची. किमान काही मूल्यांना धरून राजकारण केले जायचे. वैचारिक मतभेद वैचारिक पातळीवरच वादविवादाने लढले जायचे. प्रचारादरम्यान आणि त्याचप्रमाणे पुढे विधानसभेत, लोकसभेत अभ्यासपूर्ण मांडणी केली जायची. उत्तम अभ्यास, उत्तम विश्लेषण आणि कमालीचे वक्तृत्व यांनी या काळातील नेतृत्व संपन्न असल्याचे दिसते. नेते तत्त्वनिष्ठ, पक्षनिष्ठ होते; कारण लोकही तसेच होते. आपल्या विचारधारेच्या पक्षाच्या प्रचारासाठी घरची शिदोरी घेऊन कधी पायी, कधी सायकलने, तर कधी ट्रकमध्ये बसून प्रचार करणारे लोक होते.पुढे मात्र काळ बदलत गेला! समाजसेवेची, लोकसेवेची संकल्पना आणि धारणाच बदलत गेली. प्रत्यक्ष कामापेक्षा दिखाऊ वृत्ती वाढीस लागली. 'खादीचे पांढरे कपडे' हा समाजसेवेचा ड्रेसकोड झाला. दिवसेंदिवस लोकांचा आपमतलबीपणा वाढल्याने धनदांडग्या शक्तींना अधिक वाव मिळत गेला. लोकांचीही लोकशाहीविषयीची जाण फारशी विकसित होऊ शकली नाही. संविधानोत्तर कालखंडात संविधाननिष्ठ समाज-संस्कृती निर्माण व्हायला हवी होती; मात्र तसे न होता लोकांची मानसिकता मध्ययुगीन काळातच रेंगाळत राहिली. आपल्याला घर आहे की नाही, यापेक्षा आपल्या राजाचा वाडा किती मोठा, किती सुंदर याच मानसिकतेत लोक आजही वावरताना दिसतात. त्यामुळे त्यांना आपणच निवडून दिलेला लोकप्रतिनिधी आपला 'राजा'च वाटतो. याच मनोभूमिकेतून मग 'राजा माझ्या मुलाच्या लग्नाला हजर राहिला' आणि 'वडलांच्या दहाव्याला आला' याचेच त्याला कौतुक वाटताना दिसते. अशा माणसाला मग तो मत देऊन मोकळे होतो. राज्यकारभार करण्यासाठी आपण ज्याला आपला प्रतिनिधी म्हणून विधानसभेत, लोकसभेत पाठवणार आहोत तो खरे तर आपला 'सेवक' असतो. आपल्या वतीने तो राज्याचा, देशाचा कारभार बघणार असतो. पण एकदा सत्तास्थानी गेल्यानंतर लोकांना आणि त्या सेवकालाही या बाबीचा विसर पडतो. याचे कारण म्हणजे हा प्रतिनिधी निवडतानाच आपण चुकीचे निकष लावलेले असतात. आपल्या जातीचा आहे, गावातला आहे, वैयक्तिक कामे करणारा आहे, मतांसाठी पैसे देणारा आहे. इत्यादी, इत्यादी. अशा निकषांमुळेच डोळ्यावर पट्टी बांधली जाते आणि मग उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी दिसेनाशी होते. त्याने केलेला भ्रष्ट-आचार, बदललेला पक्ष, बदललेली मूल्ये आणि धोरणे... काही काही दिसेनासे होते.

## प्रासंगिक »

### गॅरंट्यांचा शाम्पू!

***औद्योगिकीकरणाचे महत्त्व माहीत असूनही नेते त्या वाटेला जाणार नसतील तर महाराष्ट्रास स्वत:च्या हलाखीसाठी अन्य कोणा स्पर्धकांची गरज नाही...***

अगदी अलीकडेपर्यंत केस धुण्याच्या शाम्पूतील घटकांची जाहिरात संबंधित कंपन्या आक्रमकपणे करत असत. कोणा शाम्पूत अंड्याचे सत्त्व, अन्य कोणातील सुकामेवा, कोणा दुसऱ्या शाम्पूत काकडी आदींचा रस तर अन्य कोणा शाम्पूत अन्य काही पौष्टिक घटक असल्याचे सांगितले जात असे. शाम्पूतील कथित उच्च कोटीच्या अन्नघटकांचे, पोषक तत्त्वांचे ढोल इतक्या जोरजोरात पिटले जात असत की त्या जाहिराती पाहिल्यावर; "हे इतके चांगले आहेत तर अन्न म्हणून खायला का देत नाहीत" असा प्रश्न त्या वेळी विचारला गेला. त्या शाम्पूच्या जाहिरातींचे इतके विडंबन झाले की नंतर त्यातील पोषक तत्त्वे हा चेष्टेचा विषय बनला. सद्या:स्थितीत हे शाम्पू आणि त्याच्या जाहिराती आठवण्याचे कारण म्हणजे निवडणुकेच्छुक विविध पक्षांचे प्रसृत होत असलेले जाहीरनामे.

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ग्राहककेंद्री कृषीविषयक धोरणे राबवल्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे. सरकारच्या आयात- निर्यात धोरणातील धरसोडीमुळे कांदा, सोयाबीन, कापूस, कडधान्ये यांचे उत्पादन घेणारा शेतकरी नाराज आहे. त्याची नाराजी दूर करण्यासाठी मोफतच्या, अनुदानांच्या रेवड्या उडवल्या जात आहेत.

# निवडणुकीपुरते शेतकऱ्यांना चुचकारण्याचे धोरण



हे काही निरोगी कृषी व्यवस्थेचे लक्षण नाही.सणासुदीच्या काळात जशा ठरावीक उत्पादनांच्या जाहिराती येतात, तसे सरकारकडून महागाई कमी करण्यासाठी सणासुदीच्या काळात प्रयत्न होतात. हे वर्ष मात्र त्याला अपवाद आहे. अन्नधान्याच्या किमती कमी करण्याऐवजी त्या वाढतील यासाठी चक्क केंद्र सरकारने निर्णय घेतले. मागील दशकात महागाई कमी करण्यासाठी शेतमालाचे आयात-निर्यात धोरण राबवणाऱ्या केंद्र सरकारला शेतकऱ्यांबद्दल अचानकच ममत्व वाटू लागले आहे. कारण विद्यमान सरकार हे आपल्या विरोधी आहे असा शेतकऱ्यांचा समज झाला आहे. ते भावनिक मुद्द्यांना प्रतिसाद न देता शेतमालाचे भाव का पडत आहेत, असे प्रश्न विचारू लागले आहेत. ज्याची मोठी किंमत लोकसभा निवडणुकीत सत्तारूढ भारतीय जनता पक्षाला चुकवावी लागली. शेतकऱ्यांमधील नाराजी विधानसभा निवडणुकीपूर्वी दूर करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न होत आहेत. त्यामुळे कांद्याचे दर वाढत असतानाही निर्यातीवर बंदी न टाकता निर्यात शुल्क सप्टेंबरमध्ये ४० टक्क्यांवरून २० टक्के केले. खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवले. तांदळाची निर्यात खुली केली. यामुळे तात्पुरती महागाई वाढणार याची सरकारला पूर्ण कल्पना आहे. मात्र निवडणुका जिंकण्यासाठी केंद्र सरकार हा धोका पत्करण्यास तयार आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील काही अपवाद वगळता सर्वच जागांवर महायुतीला फटका बसला होता. त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खटाटोप सुरू आहे.निवडणुकीपूर्वी घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारबद्दल लगोलग विश्वास निर्माण होण्याची शक्यता कमी दिसते. कांदा उत्पादकांचे म्हटले तर जेव्हा काढणी होऊन मोठ्या प्रमाणात कांदा बाजारात येत होता तेव्हा निर्यातीवर बंधने होती. दर दहा रुपये किलोच्या दरम्यान होते तरीही सरकारने किमान निर्यात शुल्क बाजारातील किमतीपेक्षा जास्त ठेवले होते. त्याबरोबर निर्यातीवर ४० शुल्क लावून ती ढेपाळेल याची व्यवस्था केली. यामुळे एप्रिल ते ऑगस्ट या काळात निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत ७० टक्के कमी झाली. विधानसभा निवडणुकीत कांदा उत्पादक पुन्हा एकदा आपल्याला रडवतील या भीतीतून सरकारने निर्यात शुल्काची अट काढून टाकली. निर्यातीवरील कर निम्मा केला. मात्र याचा फायदा शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांना जास्त होत आहे. काढणी केल्यानंतर शेतकरी दर वाढण्याच्या प्रतीक्षेत अनेक महिने होते. मात्र दर वाढत नाही आणि साठवलेला चाळीतील कांदा खराब होतो हे पाहून बहुतांशी शेतकऱ्यांनी कांदा सप्टेंबरपूर्वीच विकून टाकला. व्यापाऱ्यांनी केलेल्या साठ्याची आता निर्यात होत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# डांगे, स्व. एनडींच्या कारखान्यांना आडकाठी!

## तर सर्वोदय कारखानाही चर्चेत!

। सांगली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज




**इस्लामपूर विधानसभा मतदार संघात प्रचाराच्या टप्प्यावर महाविकास आघाडीचे उमेदवार आ. जयंत पाटील व महायुतीचे उमेदवार निशिकांत भोसले-पाटील (दादा) यांच्यातील लढत प्रचंड चुरशीची बनली आहे. निशिकांत भोसले-पाटील गटाकडून प्रचार सभा, कोपरा बैठकांच्या माध्यमातून जयंत पाटील यांच्या कारभारावर टीकेची झोड उठवली आहे. निशिकांतदादांच्या प्रचारात कार्यकर्त्यांची मोठी फौज दिसत आहे तर जयंत पाटील यांच्या प्रचारात कार्यकर्ते आणि कामगार व कामगारांच्या कुटुंबातील सदस्य दिसत आहेत.**

दरम्यान, या निवडणूकीत जयंत पाटील यांना माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, स्व.एन.डी.पाटील व स्व संभाजी पवार यांच्या कारखान्याचा व ऊस दराचा मुद्दा मतदारांपुढे मांडुन विरोधकांनी चांगलेच घेरल्याची चर्चा आहे. इस्लामपूर मतदार संघामध्ये प्रचार अंतिम टप्प्यात येऊन ही निवडणूक नव्या वळणावर जावून पोहचली आहे. अण्णासाहेब डांगे, स्व. एन.डी. पाटील यांच्या होणाऱ्या कारखान्यांना विरोध तर सर्वोदय कारखाना हे विषय प्रचाराच्या अंतिम टप्प्यात पुढे आले आहेत. माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांना मानणारा मोठा वर्ग तालुक्यात आहे. डांगे यांची बहुतांश कारकीर्द भाजपमध्ये गेली आहे. युती सरकारच्या काळात डांगे कॅबिनेट मंत्री होते. त्या दरम्यानच डांगे यांनी जनता सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय घेतला होता.मंजुरी ही अंतिम टप्प्यात आली होती. परंतु या होणाऱ्या कारखान्याला त्यावेळी जयंत पाटील यांनीच आडकाठी आणल्याने हा कारखाना होऊ शकला नाही असा आरोप त्यावेळी झाला होता. स्व.एन.डी. पाटील यांच्या होणाऱ्या कारखान्यालाही विरोध जयंत पाटील यांनी केला असल्याची चर्चा ऐन निवडणुकीत चौका- चौकात सुरू आहे. ऊस बिल यावरून जोरदार टीका प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात महायुतीच्या नेत्यांकडून राजारामबापू कारखान्याचा ऊस दर व दिवाळीला न मिळालेले ऊस बिल यावरून जोरदार टीका झाली. आता अंतिम टप्प्यात साखर कारखान्यांना विरोध हा विषय ऐरणीवर आला आहे. स्व संभाजी पवार यांचा सर्वोदय कारखानाही जयंत पाटील यांनी ताब्यात घेतला असल्याचा आरोप आहे.आधीच ऊस दराची चर्चा आणि त्यातच साखर कारखान्यांचा हा मुद्दा जयंत पाटील यांच्या अडचणीत भर घालणारा असल्याची चर्चा मतदार संघात सुरु आहे.

## साखर कारखान्यांना विरोध: ऊस दराचा प्रश्न विरोधकांनी आणला ऐरणीवर

### काटा मारल्याचे पुरावे...

पृथ्वीराज पवार यांनीही प्रचारसभांमधून जयंत पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. बहे येथील प्रचारसभेत बोलताना ते म्हणाले, परवा बोलताना कुठेतरी जयंत पाटील म्हणाले की स्व.संभाजी पवार यांनी डोळ्यात पाणी आणून मला साखर कारखाना घ्यायला सांगितला होता. पण मी देवा शपथ सांगतो, तो माणूस खोटं बोलत आहे. आम्ही दोघे भाऊ व आप्पा मुदत संपायच्या आधी १५ महिने त्यांच्याकडे पैसे द्यायला गेलो होतो, तेव्हा त्यांनी पैसे स्वीकारले नाहीत. त्या दिवशी खऱ्या अर्थाने माझा बाप खचला गेला. त्यावेळी आप्पा मला म्हणाले, मी ज्याला घरचा मुलगा म्हणून राजकारणात आणलं, त्यांनी केसाने गळा कापला. त्यामुळे मी लढणार आणि सर्वोदय कारखाना सभासदांच्या मालकीचा केल्याशिवाय गप्प बसणार नाही. या विश्वासघातकी प्रवृत्तीचा बिमोड करण्याची हिच योग्य संधी आपल्याला आली आहे. त्यामुळे आपल्या आई-बहिणीची काळजी घेणाऱ्या निशिकांतदादांना निवडून द्या. जयंत पाटील यांच्या कारखान्याने ऊसाच्या वजनात काटा मारला आहे. कष्टकरी शेतकऱ्यांचे अर्थिक शोषण केले आहे. काटा मारल्याचे व त्यांना अर्थिक दंड झाल्याचे पुरावे माझ्याकडे आहेत.असा आरोप पृथ्वीराज पवार यांनी यावेळी केला.

### महाविकास आघाडीला घेरले...

आ. सदाभाऊ खोत, उमेदवार निशिकांत भोसले-पाटील, पृथ्वीराज पवार यांनीही प्रचार सभांमधून याच मुद्द्यावरून जयंत पाटील यांना चांगलेच घेरले आहे. जयंत पाटील यांनी फक्त आजपर्यंत प्रत्येक गोष्टीत आडवे पडायचे काम केले. ते अण्णासाहेब डांगे, स्व.एन.डी.पाटील यांच्या होणाऱ्या कारखान्यांना आडवे पडले. स्व संभाजी पवार यांनी काढलेला कारखाना त्यांनी हाणला, अशी जहरी टीका आ.सदाभाऊ खोत हे प्रचार सभांमधून करत आहेत.

---

# देशाला धोका देणाऱ्या काँग्रेसवर विश्वास ठेवू नका

## योगी आदित्यनाथ यांचे कोल्हापुरात आवाहन

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी ।महाईन्यूज।



**'फोडा आणि राज्य करा या इंग्रजांच्या नीतीचा काँग्रेस वापर करीत आहे. जातीजातींत भांडणे लावत आहे. देव, देश आणि धर्म याबाबत आस्था नसणाऱ्या आणि नीती, निर्णयक्षमता नसणाऱ्या, देशाला धोका देणाऱ्या या पक्षावर विश्वास ठेवू नका,' असे आवाहन करताना 'राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीला बळ द्या,' असे आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.**

कोल्हापुरात महायुती उमेदवारांच्या प्रचारासाठी योगींची तपोवन मैदानावर जंगी सभा झाली. या सभेत त्यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. या वेळी खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने यांच्यासह राजेश क्षीरसागर, अमल महाडिक, राजेश क्षीरसागर, अशोकराव माने या उमेदवारांसह अनेक नेते उपस्थित होते.

मुख्यमंत्री योगी म्हणाले, 'सध्या महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये नुरा कुस्ती सुरू आहे. ते एकमेकांना धोका देत आहेत. यांनी प्रथम हिंदूंना धोका दिला. आता देशाला धोका देत आहेत. देशाला धोका देण्याचा काँग्रेसचा इतिहासच आहे. त्यांच्या या वृत्तीमुळेच पाकिस्तानची निर्मिती झाली. हे सत्य ते मानायला तयार नाहीत.

इंग्रजांचेच अंश असलेल्या काँग्रेसने त्यांच्याच 'फोडा राज्य करा' या नीतीचा वापर सुरू ठेवला आहे. जात, भाषा, प्रांत यावर आपआपसांत भांडणे लावण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. त्यांच्यामुळेच देशाला प्रत्येक वेळी अपमान सहन करावा लागत आहे.'

### योगी आदित्यनाथ यांचा सत्कार...

मूळ विचारापासून उद्धव ठाकरे दूर गेल्याचा आरोप करताना योगी म्हणाले, 'हिंदुत्वाच्या मुद्यावर शिवाजी महाराजांना डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारला पुन्हा बहुमताने निवडून द्या. म्हणजे गणेशोत्सव, रामनवमी अशा वेळी दगडफेक करणारे घरातून बाहेर पडू शकणार नाहीत.' या वेळी भाजपचे महेश जाधव, विजय जाधव, शौमिका महाडिक, जनसुराज्य शक्ती पक्षाचे समित कदम, मच्छिंद्र सकटे, पृथ्वीराज महाडिक, उत्तम कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ कोल्हापुरात झालेल्या सभेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी खासदार धैर्यशील माने, चंद्रदीप नरके, अमल महाडिक, राजेश क्षीरसागर, खासदार धनंजय महाडिक, समित कदम, अशोकराव माने आदी उपस्थित होते.

# अमित शाह यांच्या महाराष्ट्रातील सर्व सभा रद्द

## मणिपूरमध्ये परिस्थिती चिघळल्यानंतर निर्णय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आता केवळ दोन दिवस उरले आहेत. १८ तारखेला सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. यासाठी रविवार आणि सोमवारी जोरदार प्रचार करण्यासाठी राजकीय पक्ष सभा आणि मिरवणुकांचे आयोजन करत आहेत. अशावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मात्र आपला प्रचार आधीच थांबविला आहे.**



### नागपूर जिल्ह्यातील चारही सभा रद्द

रविवारी सकाळी काटोल मतदार संघात चरणसिंह ठाकूर यांच्या प्रचारासाठी व त्यानंतर सावनेर मतदार संघात आशिष देशमुख यांच्या प्रचारासाठी सभा घेणार होते. त्यासाठी सकाळी १०.३० वाजता निघणार होते. त्यानंतर गडचिरोली आणि वर्धा येथे जाहीर सभा घेणार होते मात्र रविवारी सकाळी शहा यांच्या विदर्भातील चारही सभा झाल्याचे भाजपाकडून सांगण्यात आले.शनिवारपासून मणिपूरमध्ये हिंसक परिस्थिती निर्माण झाली आहे. आंदोलनकारी जमावाने एका वरिष्ठ मंत्र्यांसह भाजपा आणि काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या घराबाहेर आग लावल्या आहेत. सुरक्षा दल राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेतीची परिस्थिती राखण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र त्यात त्यांना यश आलेले नाही.सावनेर आणि काटोलमध्ये अमित शाह यांच्या सभेसाठी जय्यत तयारी करण्यात आली होती.

मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसाळला असून परिस्थिती चिघळल्यामुळे अमित शाह तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती पीटीआय वृत्तसंस्थेने दिली आहे. मणिपूरच्या जिरिबाम जिल्ह्यात तीन महिला आणि तीन मुलांची हत्या झाल्यानंतर परस्थिती चिघळली आहे. त्यामुळे अमित शाह दिल्लीकडे रवाना झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे रविवारी नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेरसह विदर्भात गडचिरोली व वर्धा या ठिकाणी जाहीर सभा घेणार होते. १५ नोव्हेंबरला विदर्भात त्यांची यवतमाळ मतदार संघात उमरेखड येथे व चंद्रपूर जाहीर सभा होती . ती झाल्यानंतर रविवारी १७ नोव्हेंबरला त्यांची गडचिरोलीसह वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात काटोल व सावनेर येथे त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. अमित शहा यांचे शनिवारी रात्री नागपुरात आगमन झाले.त्यांचा खाजगी हॉटेलमध्ये मुक्काम होता. त्या ठिकाणी रात्री त्यांनी विदर्भातील काही भाजपा पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. रविवारी सकाळी काटोल मतदार संघात चरणसिंह ठाकूर यांच्या प्रचारासाठी व त्यानंतर सावनेर मतदार संघात आशिष देशमुख यांच्या प्रचारासाठी सभा घेणार होते. त्यासाठी सकाळी १०.३० वाजता निघणार होते. त्यानंतर गडचिरोली आणि वर्धा येथे जाहीर सभा घेणार होते मात्र रविवारी सकाळी शहा यांच्या विदर्भातील चारही सभा झाल्याचे भाजपाकडून सांगण्यात आले.शनिवारपासून मणिपूरमध्ये हिंसक परिस्थिती निर्माण झाली आहे. आंदोलनकारी जमावाने एका वरीष्ठ मंत्र्यांसह भाजपा आणि काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या घराबाहेर आग लावल्या आहेत. सुरक्षा दल राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेतीची परिस्थिती राखण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र त्यात त्यांना यश आलेले नाही. सावनेर आणि काटोलमध्ये अमित शाह यांच्या सभेसाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. नागपूर जिल्ह्यातील दोन्ही सभा घेऊन ते गडचिरोलीला रवाना होणार होते. मात्र तेथील सभा रद्द झाल्याने आता त्या ठिकाणी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहाण आणि भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या व माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी सभा घेणार आहे. काटोल व सवनेरमध्ये शिवराज सिंग चव्हाण आणि गडचिरोली व वर्धा येथे स्मृती इराणी सभा घेणार असल्याची माहिती भाजपाने दिली.मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसाळला असून परिस्थिती चिघळल्यामुळे अमित शाह तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती पीटीआय वृत्तसंस्थेने दिली आहे. मणिपूरच्या जिरिबाम जिल्ह्यात तीन महिला आणि तीन मुलांची हत्या झाल्यानंतर परस्थिती चिघळली आहे. त्यामुळे अमित शाह दिल्लीकडे रवाना झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे रविवारी नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेरसह विदर्भात गडचिरोली व वर्धा या ठिकाणी जाहीर सभा घेणार होते. १५ नोव्हेंबरला विदर्भात त्यांची यवतमाळ मतदार संघात उमरेखड येथे व चंद्रपूर जाहीर सभा होती . ती झाल्यानंतर रविवारी १७ नोव्हेंबरला त्यांची गडचिरोलीसह वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात काटोल व सावनेर येथे त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. अमित शहा यांचे शनिवारी रात्री नागपुरात आगमन झाले.

# मी लष्कर-ए-तोयबाचा सीईओ बोलतोय

## तुमच्या मागचा रस्त्यावर; रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला धमकीचा फोन!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून विमानतळ तसेच शाळा महाविद्यालयांसह विविध ठिकाणी बॉम्बस्फोट करण्याची धमकी देण्यात देत आहे. अशातच आता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियालाही अशाचप्रकारच्या धमकीचा फोन प्राप्त झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या कस्टमर केअर नंबरवर हा धमकीचा फोन करण्यात आला आहे. त्यामुळे आता खळबळ उडाली आहे.**




### इलेक्ट्रिक कार खराब झाली

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी सकाळी १० च्या सुमारास कस्टमर केअरला हा फोन करण्यात आला आहे. यावेळी समोरच्या व्यक्तीने आपण लष्कर-ए-तोयबाचा सीईओ असल्याचं सांगितलं आहे. तसेच मागचा रस्ता बंद करा, इलेक्ट्रिक कार खराब झाली आहे, असं म्हणत त्याने फोन ठेवला. मात्र, त्याठिकाणी अशी कोणतीही गाडी आढळून आलेली नाही.दरम्यान, या घटनेची गांभीर्याने दखल घेत रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांकडून माता रमाबाई मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी सकाळी १० च्या सुमारास कस्टमर केअरला हा फोन करण्यात आला आहे. यावेळी समोरच्या व्यक्तीने आपण लष्कर-ए-तोयबाचा सीईओ असल्याचं सांगितलं आहे. तसेच मागचा रस्ता बंद करा, इलेक्ट्रिक कार खराब झाली आहे, असं म्हणत त्याने फोन ठेवला. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी बँकेच्या सुरक्षा रक्षकाला जाऊन तपासणी करण्यात सांगितले. मात्र, त्याठिकाणी अशी कोणतीही गाडी आढळून आलेली नाही.दरम्यान, या घटनेची गांभीर्याने दखल घेत रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांकडून माता रमाबाई मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर आता याप्रकरणाचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितलं आहे. कुणीतरी खोडसाड वृत्तीने हे कृत्य केल्याचा प्राथमिक संशय आहे. मात्र, आम्ही याची गांभीर्याने दखल घेतली असून फोन करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहोत, असं पोलिसांनी सांगितलं आहे.

## अर्चना गौतमला मारहाण

नुकताच अर्चना गौतमसोबत गैरवर्तनाचा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये काही महिला नवी दिल्ली काँग्रेस कार्यालयाबाहेर अर्चनाला मारहाण करताना दिसत आहेत. या घटनेत तिचे वडीलही गंभीर जखमी झाले आहेत. रस्त्यावर पडल्यानंतर ते मदतीची याचना करताना दिसले. या घटनेवर अर्चनाने म्हटले आहे की, हे ऑन रोड रेपपेक्षा कमी नाही. या घटनेवर अर्चनाने दिव्य मराठीशी खुलेपणाने संवाद साधला. महिला आरक्षण विधेयक मंजूर झाल्याबद्दल पक्षाचे आणि त्यांच्या वरिष्ठ नेत्यांचे अभिनंदन करण्यासाठी कार्यालयात गेल्या होत्या, मात्र कार्यालयाबाहेर तिला या भयंकर गर्दीचा सामना करावा लागला, असे तिने सांगितले. मी एका जाहिरातीच्या शूटिंगसाठी आग्रा येथे गेले होते. तिथून परतल्यावर विमानतळावर चेकआऊट केले. कार्यालयात जाऊन बिल पास झाल्याबद्दल लोकांचे अभिनंदन करण्याचा विचार केला. आम्ही गेटवर पोहोचलो तेव्हा काही महिलांनी आम्हाला आत जाण्यापासून रोखले आणि म्हणाल्या- तुम्ही जाऊ शकत नाही. मी कारण विचारल्यावर त्यांनी उत्तर दिले की माझा प्रवेश रोखण्यात आला आहे. मी त्यांच्याशी बोलत असताना अनेक महिला आल्या. सगळे माझ्यासमोर येऊन उभे राहिले. मी काही स्त्रियांना ओळखले पण मला काही कळत नव्हते काय होत आहे. गर्दी पाहून माझ्या वडिलांना प्रकरणाचे गांभीर्य समजले आणि त्यांनी मला तेथून जाण्यास सांगितले. माझ्या वडिलांनी जे सांगितले ते मलाही योग्य वाटले आणि मी निघून जाण्याचा प्रयत्न करू लागले.



## सिंधूताई मालिकेतली चिंधी झाली मोठी!

कलर्स मराठीवरील सिंधूताई माझी माई ही मालिका सध्या चर्चेत आहे. ही मालिका थोर समाजसुधारक सिंधूताई सपकाळ यांच्या आयुष्यावर आधारीत आहे. सिंधूताई सपकाळ यांना अनाथांची माय असं संबोधलं जातं. या मालिकेला प्रेक्षकांकडून चांगलं प्रेम मिळालं. मालिका TRP च्या शिखरावर आहे. अशातच सिंधूताई माझी माई मधील चिंधी आता मोठी होणार असुन एका लोकप्रिय अभिनेत्रीची एन्ट्री होणार आहे. कलर्स मराठीवरील सिंधूताई माझी माई ही मालिका सध्या चर्चेत आहे. ही मालिका थोर समाजसुधारक सिंधूताई सपकाळ यांच्या आयुष्यावर आधारीत आहे. सिंधूताई सपकाळ यांना अनाथांची माय असं संबोधलं जातं. या मालिकेला प्रेक्षकांकडून चांगलं प्रेम मिळालं. मालिका TRP च्या शिखरावर आहे. अशातच सिंधूताई माझी माई मधील चिंधी आता मोठी होणार असुन एका लोकप्रिय अभिनेत्रीची एन्ट्री होणार आहे. ज्यांच्या आभाळाएवढ्या कार्याने सगळ्यांचं मन जिंकलं, ज्या लाखो अनाथ लेकरांच्या आई बनल्या अशा पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या आयुष्याची प्रेरणादायी संघर्षमय गाथा, "सिंधुताई माझी माई - गोष्ट चिंधीची" या मालिकेत बघायला मिळतेय.

## उर्फीला पाहून नेटकऱ्यांनी चालीसा म्हटली ?



उर्फी जावेदन अन् तिची फॅशन हे समीकरण सर्वांना माहीतच आहे. ती अशी काही फॅशन करते जी नेटकऱ्यांच्या विचारा पलिकडे असते. मनोरंजन विश्वात उर्फीची वेगळीच ओळख आहे. अनेक कारणांसाठी ती चर्चेत राहते. तिची फॅशनच तिला लाईमलाईटचा भाग बनवते. बऱ्याचदा अतरंगी फॅशनमुळे असणाऱ्या उर्फीनं तर आता कहरच केला आहे. आता तिच्या अलीकडच्या लूकने तिच्या चाहत्यांना धक्काच बसला आहे. उर्फी जावेदने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये ती एका काळ्या रंगाच्या ड्रेसमध्ये दिसत आहे. ज्यात तिचा ड्रेस, सोन्याचे दागिने, ब्लॅक लिप लाइनर आणि हॉरर मेकअप तिने केला आहे. यात उर्फी एका सैतानसारखी दिसते. हा व्हिडिओ पोस्ट करत उर्फीने लिहिले - 'माझ्या आत असलेल्या सैतानला बाहेर काढण्याची कल्पना.'

## जुई गडकरीने दिलं चोख उत्तर

जुई गडकरी ही मराठी मनोरंजन विश्वातील चर्चेतील अभिनेत्री. जुईला आपण याआधी अनेक मालिका, सिनेमांमध्ये पाहिलंय. जूई गडकरीने सध्या ठरलं तर मग मालिकेत अभिनय करतेय. जुई सोशल मिडीयावर विविध फोटो पोस्ट करत असते. या फोटोंवर जुईचे चाहते विविध कमेंट्स करत असतात. जुईच्या एका फॅनने तिच्या फोटोवर अशीच एक कमेंट केली आहे. त्यावर जुईने केलेला रिप्लाय सुद्धा व्हायरल झालाय. जुईने काही तासांपूर्वी एक फोटो शेअर केलाय. या फोटोत जुईने लाल रंगाच्या साडीत जमिनीवर बसून फोटोशूट केलंय. या फोटोवर चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केलाय. जुईने केलेल्या या फोटोशूटवर तिच्या फॅन्सनी अनेक भारी भारी कमेंट्स केल्या आहेत. अशातच एका फॅनने केलेली कमेंट आणि त्यावर जुईने केलेला रिप्लाय चर्चेत आलाय जुईच्या या फोटोवर तिच्या चाहत्याची कमेंट व्हायरल झालीय. जुईच्या एका चाहत्याने म्हटलंय की, फोटो छान आहे पण खाली का बसलीय? जुईने या कमेंटची दखल घेतली आणि म्हणाली, "माणसाने नेहमी जमिनीवरच राहावं." जुईने दिलेला हा रिप्लाय तिच्या फॅनला चांगलाच आवडला. तो पुढे म्हणाला, " YEAH IN LIFE, NOT LITERALLY. पण आवडला तुमचा हजरजबाबीपणा. बाकी काही नाही तुमची इतकी सुंदर साडी खराब होईल म्हणून म्हटलं." जूई सध्या स्टार प्रवाहवरील ठरलं तर मग मालिकेत अभिनय करत आहे. जूईची ही नव्याने सुरु झालेली मालिका TRP मध्ये टॉपला असते. या मालिकेत जूई सोबक अमित भानूशाली, ज्योती चांदेकर, सचिन गोखले असे कलाकार बघायला मिळतात..



## अभिनेत्रीने 'बॉलीवूड'ला दाखवला आरसा!

'द फॅमिली मॅन' नावाच्या सीरिजमध्ये मनोज वाजपेयीच्या पत्नीची भूमिका करणाऱ्या प्रियामणिला त्या वेबसीरिजनं प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली होती. यापूर्वी तिनं शाहरुख खानच्या चैन्नई एक्सप्रेसमध्ये छोटीशी भूमिका साकारली होती. आता ती किंग खानच्या जवानमध्ये चमकल्याचे गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूड विरुद्ध टॉलीवूड असा वाद सुरु आहे. त्यात अनेक सेलिब्रेटींनी दोन्ही स्ट्रीममधील चित्रपट, त्यांचा विषय, कलाकार आणि सादरीकरण यावर वेगवेगळ्या प्रतिक्रियाही दिल्या आहेत. त्यात आता प्रियामणिच्या नावाची भर पडली आहे. तिनं परखडपणे तिची भूमिका मांडली आहे. इंडियन एक्सप्रेसनं याबाबत सविस्तर वृत्त दिले असून त्याची चर्चा होत आहे. दिसून आले आहे. शाहरुखच्या जवानमध्ये प्रियामणिनं लक्ष्मी नावाची व्यक्तिरेखा साकारली आहे. तिच्या या भूमिकेचे प्रेक्षकांनी कौतुक केले आहे. तिनंही एका मुलाखतीमध्ये शाहरुख सोबत भूमिका करताना आपल्याला खूप काही शिकायला मिळाले. आपण त्याचे मोठे चाहते असून त्यानं दिलेल्या संधी बद्दल त्याचे आभारही मानले होते. यासगळ्यात तिला जेव्हा बॉलीवूड आणि टॉलीवूड यांच्या चित्रपटांमधील महत्वाचा फरक कोणता असा प्रश्न तिला विचारण्यात आला. तेव्हा तिनं दिलेलं उत्तर चर्चेत आलं आहे. प्रियामणिनं तिच्या अंदाजात उत्तर दिलं आहे. ती म्हणते, दाक्षिणात्य चित्रपट निर्माते किंवा दिग्दर्शक राजकीय विषयांवर जेव्हा चित्रपट करतात तेव्हा ते थेटपणे त्या विषयातून भाष्य करतात. त्यांचा प्रयत्न जास्त प्रभावीपणे आपला संदेश प्रेक्षकांपर्यंत जावा असा असतो. तुलनेनं बॉलीवूडचे चित्रपट हे थोडी नरमाईची भूमिका घेतात. त्यांची ती भूमिका स्पष्टपणे घेतलेली नसते. अशा शब्दांत प्रियामणिनं तिची भूमिका मांडली आहे. एवढेच नाही तर दाक्षिणात्य चित्रपटांनी अनेकदा वेगवेगळ्या सामाजिक मुद्द्यांवर थेटपणे भाष्य केले आहे. त्यामुळे त्या कलाकृती लोकप्रिय झाल्या आहेत. हा टॉलीवूड आणि बॉलीवूडमधील महत्वाचा फरक आहे. जवानच्या माध्यमातून देखील एक सामाजिक संदेश प्रेक्षकांना देण्यात आला आहे. त्याविषयी तिनं तिचं मत व्यक्त केलं आहे. दिग्दर्शक ॲटलीच्या जवाननं तीन आठवड्यांमध्ये विक्रमी कमाई केल्याचे दिसून आले आहे. आतापर्यंत या चित्रपटानं सातशे कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. याच वर्षी शाहरुखचा पठाण नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यानंही बॉक्सऑफिसवर मोठी कमाई केल्याचे दिसून आले होते.



# रोहित पहिल्या कसोटीतून बाहेर!

## रोहितच्या जागी जसप्रीत बुमराहला संघात स्थान मिळणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला कसोटी सामना २२ नोव्हेंबरपासून खेळवला जाणार आहे. पहिल्या कसोटीपूर्वी रोहित शर्माबाबत मोठी अपडेट समोर येत आहे. पर्थ येथे खेळवण्यात येणाऱ्या या पहिल्या कसोटी सामन्यात रोहित शर्मा खेळणार नसल्याचे त्याने बीसीसीआयला स्पष्ट केले आहे, असे वृत्त इंडियन एक्सप्रेसने बीसीसीआयच्या सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.**



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पर्थ येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी कसोटी सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मा खेळणार नाही. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, रोहित शर्माने बीसीसीआयला ही माहिती दिली आहे आणि त्याने सांगितले आहे की त्याच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर त्याला त्याच्या कुटुंबासोबत थोडा वेळ घालवायचा आहे. रोहितच्या अनुपस्थितीत संघाचा उपकर्णधार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह संघाची कमान सांभाळेल. रोहित ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या सामन्यापूर्वी टीम इंडियामध्ये सामील होईल म्हणजेच तो दुसरा कसोटी सामना खेळणार आहे.रोहितच्या अनुपस्थितीमुळे भारतीय निवड समितीने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारत ए संघाचा भाग असलेल्या देवदत्त पडिक्कलला फक्त ऑस्ट्रेलियात थांबण्यास सांगितले आहे. पर्थमधील ओपस स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी रोहितच्या जागी पडिक्कलचा १८ सदस्यीय भारतीय संघात समावेश करण्यात येईल.बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, “आम्हाला आशा होती की तो (रोहित) ऑस्ट्रेलियाला जाईल, परंतु त्याने बीसीसीआयला कळवलं आहे की त्याला आणखी काही वेळ हवा आहे आणि त्यामुळे तो आताच ऑस्ट्रेलियाला जाऊ शकत नाही. ॲडलेड येथे होणाऱ्या दुसऱ्या पिंक टेस्ट सामन्यासाठी तो ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. पहिल्या आणि दुसऱ्या कसोटीच्या दरम्यान नऊ दिवसांचं अंतर आहे, त्यामुळे रोहित शर्मा वेळेत संघात दाखल होईल.”शनिवारी सामन्याच्या सिम्युलेशन दरम्यान क्षेत्ररक्षण करताना शुबमन गिलचा अंगठा फ्रॅक्चर झाल्यानंतर भारताच्या फलंदाजीच्या क्रमवारीत निश्चितपणे बदल होतील. गिल पहिल्या कसोटीला मुकणार आहे आणि त्यामुळे केएल राहुलला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळणार आहे. रोहितच्या अनुपस्थितीत, यष्टिरक्षक ध्रुव जुरेलला एक फलंदाज म्हणून संधी मिळू शकते. जुरेलने ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात ८० आणि ६४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत स्वत:ला सिद्ध केले आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पर्थ येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी कसोटी सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मा खेळणार नाही. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, रोहित शर्माने बीसीसीआयला ही माहिती दिली आहे आणि त्याने सांगितले आहे की त्याच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर त्याला त्याच्या कुटुंबासोबत थोडा वेळ घालवायचा आहे. रोहितच्या अनुपस्थितीत संघाचा उपकर्णधार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह संघाची कमान सांभाळेल. रोहित ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या सामन्यापूर्वी टीम इंडियामध्ये सामील होईल म्हणजेच तो दुसरा कसोटी सामना खेळणार आहे.रोहितच्या अनुपस्थितीमुळे भारतीय निवड समितीने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारत ए संघाचा भाग असलेल्या देवदत्त पडिक्कलला फक्त ऑस्ट्रेलियात थांबण्यास सांगितले आहे. पर्थमधील ओपस स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी रोहितच्या जागी पडिक्कलचा १८ सदस्यीय भारतीय संघात समावेश करण्यात येईल.बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, “आम्हाला आशा होती की तो (रोहित) ऑस्ट्रेलियाला जाईल, परंतु त्याने बीसीसीआयला कळवलं आहे की त्याला आणखी काही वेळ हवा आहे आणि त्यामुळे तो आताच ऑस्ट्रेलियाला जाऊ शकत नाही. ॲडलेड येथे होणाऱ्या दुसऱ्या पिंक टेस्ट सामन्यासाठी तो ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. शनिवारी सामन्याच्या सिम्युलेशन दरम्यान क्षेत्ररक्षण करताना शुबमन गिलचा अंगठा फ्रॅक्चर झाल्यानंतर भारताच्या फलंदाजीच्यानिश्चितपणे बदल होतील.

### यष्टिरक्षक ध्रुव जुरेलला संधी मिळू शकते

आणि त्यामुळे केएल राहुलला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळणार आहे. रोहितच्या अनुपस्थितीत, यष्टिरक्षक ध्रुव जुरेलला एक फलंदाज म्हणून संधी मिळू शकते. जुरेलने ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात ८० आणि ६४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत स्वत:ला सिद्ध केले आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पर्थ येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी कसोटी सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मा खेळणार नाही. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, रोहित शर्माने बीसीसीआयला ही माहिती दिली आहे आणि त्याने सांगितले आहे.

# ‘जर सुरुवात चांगली झाली नाही तर...’

## बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीत ऑस्ट्रेलियाच पारडे जड : हरभजन सिंग

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास एका आठवड्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. दोन्ही संघ तयारीत व्यस्त आहेत, तर माजी क्रिकेटपटूंनी आगामी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीबाबत अनेक भाकीत केले आहेत. पर्थमध्ये विजयाची नोंद करून संघाला दमदार सुरुवात करावी लागेल, आत्मविश्वास वाढेल आणि या कठीण दौऱ्यात त्यांना पुढे जाण्यास मदत होईल, असा विश्वास माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगने व्यक्त केला.**





न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारताला ०-३ असा पराभव स्वीकारावा लागला होता. यावर हरभजन सिंग म्हणाला की, मालिका गमावल्यामुळे संघाचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे, पण ऑस्ट्रेलियातील परिस्थिती घरच्या परिस्थितीपेक्षा वेगळी असल्याने भारतीय फलंदाजांची त्याला फारशी चिंता नाही. तो पुढे म्हणाला की, टीम इंडिया ट्रॉफीवर पुन्हा एकदा नाव कोरण्याची शक्तता ५०-५० टक्के आहे. जतिन सप्रूच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना हरभजन सिंग म्हणाला, ” टीम इंडिया पुन्हा एकदा बॉर्डर गावस्कर ट्रॉफी जिंकण्याची शक्यता ५०-५० टक्के आहे. मी भारताने अलीकडे खेळलेल्या क्रिकेटचा विचार करत नाही, कारण इथली परिस्थितीत वेगळी होती. चांगल्या फलंदाजाकडे पाहून देखील असे वाटत होते की त्यांना फलंदाजी कशी करावी हे माहित नाही.”हरभजन म्हणाला कीसंघाचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे, पण ऑस्ट्रेलियातील परिस्थिती घरच्या परिस्थितीपेक्षा वेगळी असल्याने भारतीय फलंदाजांची त्याला फारशी चिंता नाही.

### वरिष्ठ खेळाडूंनी रणजी करंडक खेळावा

माजी फिरकीपटूने सांगितले की, भारताची ट्रॉफी राखण्याची शक्यता ५०-५० टक्के आहे. जतिन सप्रूच्या यूट्यूब चॅनलवर हरभजन सिंग म्हणाला, “मी भारताने अलीकडे खेळलेल्या क्रिकेटचा मी विचार करत नाही कारण परिस्थिती वेगळी होती. चांगल्या फलंदाजाकडे पाहून असे दिसते की त्याला फलंदाजी कशी करावी हे माहित नाही. वरिष्ठ खेळाडूंनी रणजी करंडक खेळावा, असे लोक म्हणत होते.